भौतिकोपचार महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत.

श्री.सिद्धेश्वर देवस्थान, श्री.सिद्धेश्वर मंदिर, सिद्धेश्वर पेठ, जि.सोलापूर संचलित श्री.सिद्धेश्वर कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, सिद्धेश्वर पेठ, पंच कट्टा, सोलापूर.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: पीएसओ-२०२१/प्र.क्र.१८१/२१/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : २० डिसेंबर, २०२१

वाचा : १) शासन निर्णय, क्र.एमईडी-२०१७/प्र.क्र.२१०/१७/शिक्षण-१, दि.२६.१०.२०१७.
२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-६/७६३/२०२०, दि.२९.१२.२०२०.
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं/नवीन/बीपीटीएच/युजी/श्रीसिध्देश्वर/पीटीसोलापूर/युजी-०६/२०२१/२५६१/१-अ, दि.०५.१०.२०२१.

प्रस्तावना:

श्री.सिद्धेश्वर देवस्थान, श्री.सिद्धेश्वर मंदिर, सिद्धेश्वर पेठ, जि.सोलापूर संचलित श्री.सिद्धेश्वर कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, सिद्धेश्वर पेठ, पंच कट्टा, सोलापूर या संस्थेचा भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(२) च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली होती. त्यानुसार सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यांनी उक्त संस्थेतील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाला परवानगी देण्याबाबत शिफारस केली आहे. सदर शिफारस विचारात घेऊन उक्त महाविद्यालयातील भौतिकोपचार अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन श्री.सिद्धेश्वर देवस्थान, श्री.सिद्धेश्वर मंदिर, सिद्धेश्वर पेठ, जि.सोलापूर संचलित श्री.सिद्धेश्वर कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, सिद्धेश्वर पेठ, पंच कट्टा, सोलापूर या संस्थेतील भौतिकोपचार पदवी

अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) या महाविद्यालयातील भौतिकोपचार पदवी या अभ्यासक्रमाच्या ६० (साठ) इतक्या प्रवेश क्षमतेस मंजूरी देण्यात येत आहे.

२) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

३) राज्य शासनाने तसेच विद्यापीठाने भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) संस्थेने उपरोक्त भौतिकोपचार महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती वा अन्य स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

७) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत सदरहू संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरण्यात येणार नाहीत.

८) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

९) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहित मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

१०) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या शिफारशींच्या आधारे सदर परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.श्रीनिवास पुं. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
१०. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, वांद्रा(पू), मुंबई-४०००५१.
११. अध्यक्ष/सचिव, श्री.सिद्धेश्वर देवस्थान, श्री.सिद्धेश्वर मंदिर, सिद्धेश्वर पेठ, जि.सोलापूर.
१२. अवर सचिव (शिक्षण-२), वै.शि. व औ.द्र. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (शिक्षण-१).